MHAH210008212017

**निशाणी १ वरील आदेश**
**(सरकार वि. किरण क्षिरसागर)**

प्रस्तुतचे दोषारोपपत्र जामखेड पोलीस स्टेशन यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९ अन्वये दाखल केलेला आहे.

२. फिर्यादी प्रदिप प्रल्हाद राऊत यांनी फिर्याद दिली की, दिनांक १०.०१.२०१७ रोजी रात्री १२.३५ वाजताचे सुमारास भुतवडा रोडलगत असलेले त्यांचे शेतजमिन गट क्रमांक १३५२ मधील गोठ्यात बांधलेल्या तीन म्हैसी किंमत रुपये १,७०,०००/– च्या किरण मोतीराम क्षिरसागर यांनी चोरुन नेल्या. म्हणुन त्याने तक्रार दिली.

३. आरोपी हजर राहत नसल्याने त्यांचेविरुध्द बिनजामिनपात्र अधिपत्र काढण्यात आले. त्यानंतर दिनांक ०७.०१.२०२५ रोजी आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ८२ अन्वये अधिपत्र काढले. परंतु तरीदेखील आरोपी मिळून न आल्याने प्रकरण फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २९९ प्रमाणे चालवण्यात आले.

४. दिनांक २९.०४.२०२६ रोजी अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक १ साक्षीदार दत्तात्रय धोंडीराम राऊत, साक्षीदार क्रमांक २ अजित रमेश राऊत यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, त्यांच्या म्हैशी चोरुन नेल्या होत्या. नळेवडगाव येथे दोन म्हैशी सापडल्या होत्या. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदवला नव्हता. इतर मजकुर त्याने नाकारला. अभियोगपक्षाच्या सदर तीनही साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. मात्र त्यांना पुरक अशा बाबी अभिलेखावर आल्या नाही.

५. पुराव्याचे अवलोकन केले. तक्रारदार साक्षीदार क्रमांक १ याने त्याच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ मजकुर पोलीसांना सांगितला नसल्याचे कथन केले आहे. तसेच अजित रमेश राऊत याने देखील

पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला नसल्याचे व घटनेबाबत पोलीसांनी काही विचारले नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे अभियोपगक्षाने फिर्याद शाबीत केलेली नाही. पुरेशी संधी देऊन देखील अभियोगपक्षाने इतर साक्षीदारांची साक्ष तपासलेली नाही. त्यामुळे, आरोपीविरुध्द कोणताही पुरावा मिळुन आला नाही. त्यामुळे फिर्यादीमधील मजकुर शाबीत झालेला नाही. प्रस्तुतचे प्रकरण सन २०१७ पासुन प्रलंबीत आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | आरोपी **किरण मोतीराम क्षिरसागर** यास भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ अन्वये दोषमुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे जामिन व बंधपत्रे याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | पोलीस निरीक्षक, जामखेड पोलीस स्टेशन यांनी आरोपीविरुध्द असलेले बिनजमानती अधिपत्र/स्टँडींग वॉरंट न बजावता न्यायालयास परत पाठवावे. |

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.06.06 17:32:03 +0530

**( यु. ए. भोसले )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
**जामखेड**

दिनांक– ०६/०६/२०२६
ठिकाण – जामखेड